शुक्रवार दि.२५ ऑक्टोबर २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०२ अंक : ५१

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in


# शरद पवार गटाची ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

# बारामती येथून युगेंद्र पवार यांना संधी

## यादीत सर्वच महत्त्वाच्या नेत्यांचा समावेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाविकास आघाडीतील प्रमुख घटकपक्ष असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने गुरुवारी सायंकाळी आपल्या ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यात इस्लामपूर येथून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काटोल येथून राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख, घनसांगवी येथून माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुंब्रा- कळवा येथून पक्षाचे ज्येष्ठ नेते जितेंद्र आव्हाड व इंदापूर येथून हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत आपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. शरद पवार गटाच्या यादीनुसार स्वतः जयंत पाटील हे इस्लामपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. पक्षाने बारामती विधानसभा मतदारसंघातून युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात युगेंद्र पवार यांचा सामना त्यांचे चुलते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी होईल. त्यामुळे बारामतीत लोकसभा निवडणुकीसारखीच हायव्होल्टेज लढत होणार हे स्पष्ट झाले आहे. लोकसभा निवडणुकीत या ठिकाणी शरद पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे यांचा सामना अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याशी झाला होता. त्यात सुप्रिया सुळे यांचा विजय झाला होता.




| | |
|---|---|
| जयंत पाटील – इस्लामपूर | दिलीप घोडपे – जामनेर |
| अनिल देशमुख – काटोल | रोहिणी खडसे – मुक्ताईनगर |
| राजेश टोपे – घनसांगवी | सम्राट डोंगरदिवे – मूर्तीजापूर |
| बाळासाहेब पाटील – कराड उत्तर | दिनेश्वर पेठे – नागपूर पूर्व |
| जितेंद्र आव्हाड – मुंब्रा कळवा | रविकांत गोपचे – तिरोडा |
| शशिकांत शिंदे – गोरेगाव | भाग्यश्री आत्राम – अहेरी |
| जयप्रकाश दांडेगावकर – वसमत | रुपकुमार ऊर्फ बबलू चौधरी – बदनापूर |
| गुलाबराव देवकर – जळगाव ग्रामीण | सुभाष पवार – मुरबाड |
| हर्षवर्धन पाटील – इंदापूर | राखी जाधव – घाटकोपर पूर्व |
| प्राजक्त तनपुरे – राहुरी | देवदत्त निकम – आंबेगाव |
| अशोकराव पवार – शिरुर | युगेंद्र पवार – बारामती |
| मानसिंगराव नाईक – शिराळा | संदीप वरपे – कोपरगाव |
| सुनील भुसारा – विक्रमगड | प्रताप ढाकणे – शेवगाव |
| रोहित पवार – कर्जत जामखेड | राणी लंके –पारनेर |
| विनायकराव पाटील – अहमदपूर | मेहबूब शेख – आष्टी |
| राजेंद्र शिंगणे – सिंदखेड राजा | नारायण पाटील – करमाळा |
| सुधाकर भालेराव – उदगीर | महेश कोठे – सोलापूर शहर उत्तर |
| चंद्रकांत दानवे – भोकरदन | प्रशांत यादव – चिपळूण |
| प्रदीप नाईक – किनवट | समरजित घाटगे – कागल |
| विजय भांबळे – जिंतूर | रोहित आर. पाटील – तासगाव कवठेमहांकाळ |
| पृथ्वीराज साठे –केज | चरण वाघमारे – तुमसर |
| संदीप नाईक – बेलापूर | प्रशांत जगताप –हडपसर |
| बापूसाहेब पठारे – वडगाव शेरी | |

# साहेबरावतात्या नंदन लिखीत परिसस्पर्श संघर्षातून जीवनाचे सोनं करणारी वास्तवदर्शी कादंबरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिर्डी । प्रतिनिधी**

पिंपळनेर येथील सेवानिवृत्त प्राध्यापिका सौ.पुष्पलता संभाजी पगारे यांच्या संपूर्ण जीवनावर आधारित लेखक साहेबराव नंदन लिखित अस्सल ग्रामीण बाज व सुख, दु:ख ,परंपरा, रूढी व संघर्षातून जीवनाचे सोनं करणारी वास्तवदर्शी अशा परिसस्पर्श,या चरित्रात्मक (कांदबरी) पुस्तकाचे प्रकाशन मोठ्या जल्लोषात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य विलास चव्हाण हे ह्या सोहळयात अध्यक्षस्थानी होते. हा प्रकाशन सोहळा दाजी साठ्ये इंग्लिश मेडियम स्कूल च्या सभागृहात नुकताच मोठ्या उत्साहात घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पालखेड नाशिकचे ग्रामीण साहित्यिक, कवी, संपादक विजयकुमार मिठे,ॲड. संभाजीराव पगारे, सभापती हर्षवर्धन दहिते, कविवर्य जगदीश देवपूरकर,ज्ञानसिंधू प्रकाशनचे तान्हाजी खोडे, अमळनेरचे साहित्यिक प्रकाश पाटील,डॉ.कीर्तनकार सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामचंद्र महाराज नंदन,पत्रकार राजेंद्र गवळी, अ.भा.मा.संघाचे विलासराव पाटील,वसंतराव बच्छाव, प्रदीप कोठावदे, विष्णू जिरे पाटील, विजयराव सोनवणे, देवेंद्र गांगुर्डे, योगेश नेरकर, विनोद कोठावदे, सतीश पाटील, पांडुरंग सूर्यवंशी, प्रमोद गांगुर्डे,स्वप्नील पगारे, छाया पगारे,सुवर्णा आजगे, ईश्वर बोरसे, प्रा. डी. टी. पाटील, मिलींद महाजन, संगीता भामरे दहिवेल,माजी उपप्राचार्य डी. झेड. पाटील, प्रा.एस.डी.पाटील, कमलाकर क्षीरसागर,हभप विजय काळे, ललित साळवे, अशोक पाटील नाशिक, सौ. संगीता भामरे, आर. के. पाटील, सौ. तारका विवरेकर, डी.एल. पाटील,डॉ. राजेंद्र पगारे, दिलीप घरटे, वसंत चौधरी, प्रशांत कोतकर, भीमराव सोनवणे, यांच्या सह अनेक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी साहित्यिक विजयकुमार मिठे यांनी लेखक साहेबराव नंदन यांच्या कांदबरी लिखाणाचे कौतुक करीत या पुस्तकातून नायिका पगारे यांच्या जीवनावर संस्कार, चांगल्या रूढी परंपरा यांचे संमिश्र दर्शन घडवले आहे. स्री नायिका पुष्पलता पगारे यांच्या जीवनातील संघर्ष, परिश्रम, जिज्ञासा, दातृत्व,अशा गुणांच्या माध्यमातून संस्कार देणारे पुस्तक असल्याचे ही कौतुक केले. तर प्राचार्य विलासराव चव्हाण यांनी




ही पुष्पलता पगारे यांच्या पतीसहवासाचा परिसस्पर्श यांच्यातील तुलनात्मक मुद्दा मांडत कांदबरीतील नायिका यांचे जीवनातील संघर्ष, कुटुंब प्रेम,समर्पण भावना, परोपकारी वृत्ती अशा प्रसंगानुरूप घटनांचे वर्णन करून लेखकाचे ही कौतुक केले. याप्रसंगी, महात्मा फुले विद्या प्रसारक संस्था, पिंपळनेर,आदिवासी आश्रमशाळा सामोडे, कुसुंबा, मैदानी, पिंपळनेर वाचनालय, भटक्या विमुक्त जा, जमाती आश्रमशाळा यांच्या वतीने संभाजी पगारे, व त्यांच्या संचालकांनी उपस्थितांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. कार्यक्रमात जगदीश देवपूरकर यांनी त्यांच्या बहारदार शैलीत मनोगत व्यक्त करीत पुष्पलता पगारे यांच्या जीवनातील काही प्रसंग कथन केले. तर प्रकाशक तान्हाजी खोडे यांनी प्रकाशक म्हणून मनोगत व्यक्त केले.कवी प्रकाश पाटील, हभप रामचंद्र नंदन, प्रा.एस.डी. नंदन, संगीता भामरे,लेखक साहेबराव नंदन,प्रा.पुष्पलता पगारे आदी मान्यवरांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीसस्पर्श कादंबरीचे प्रस्तावनाकार व लघु कथाकार राजेंद्र गवळी यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उमेश माळी व प्रा.सविता पगारे यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन टाळ्यांच्या गजरात करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मनीष माळी, राजेंद्र क्षीरसागर, शांताराम मोरे, उमेश माळी, मुख्याध्यापक श्री जगताप,राजेंद्र सोनवणे,श्री. वाणी, झेड. एम. गवळी,गोरख पवार,जे.पी.सोनवणे,श्री शेवाळे, पिंपळनेर, सामोडे,कुसुंबा आश्रमशाळेतील शिक्षक, संचालक मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# भव्य किर्तन व महा प्रसादाचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

केज शहरापासुन दोन किलोमिटर अंतरावर आसणार्या श्रीकृष्ण मठ येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वद्य (कृ.)आष्ठमी निमीत्त गुरूवार दि २४ आक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ ते ०१ वाजता श्री. ह.भ.प.विद्वतरत्न भगवान महाराज शास्त्री(वरपगांवकर) यांचे हरी किर्तन व नंतर महाप्रसाद हा कार्यक्रम संपन्न झाला प्रत्येक महिन्याच्या वद्य आष्टमी ला किर्तन सेवा केली जाते गायनाचार्य ठोंबरे महाराज महादेव महाराज ,मृदंगाचार्य गणेश महाराज,आरोग्य सल्लागार बबन ढाकणे , आन्नदाते भगवान किसन सारूक ,नारायण नाना घुले, दरवर्षी प्रमाणे अपंगाची दिपावली साजरी व्हावी हा ऊपक्रम दि. ०४ नोव्हेंबर रोजी करण्याचे आयोजन केले आहे,तरी दिव्यांग बांधवांनी दि. ०२ नोंव्हेबर पर्यंत नांव नोंदणी करुन पास घेणे बंधनकारक आहे असे आव्हान भागवत भुषण ह.भ.प. श्री .केशव महाराज शास्त्री व भगवान श्रीकृष्ण आश्रम भक्त परिवार यांनी केले सर्वाचे आभार केशव महाराज यांनी केले.पंचक्रषीतील भगवान श्रीक्रष्ण भक्त परिवार उपस्थीत होता.

# श्रीगोंदा नगर विधानसभा मतदार संघात अखेर आघाडीत बिघाडी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात आघाडीत बिघाडी होणार हा अंदाज लोकनेता न्युज नेटवर्क चे प्रतिनिधी ज्ञानेश्वर येवले यांनी दिनांक ११ आक्टोंबर च्या अंकात दिला होता तो अंदाज तंतोतंत खरा ठरला आहे आज आघाडीच्या मुंबई येथे झालेल्या बैठकीत आयत्या वेळी आयाराम झालेल्या नागवडे यांना उमेदवारी जाहीर केली त्यामुळे श्रीगोंदा तालुक्यात नागवडे समर्थकांनी फटाके फोडून जल्लोष केला मात्र आघाडी मध्ये बिघाडी बिघाडी झाली आहे शरद पवार गटाचे प्रबळ दावेदार राहुल जगताप हे मात्र नाराज झाले असून बंडाचे निशाण फडकविणार आहेत हे मात्र नक्की जगताप मुंबई मध्ये माध्यमांशी बोलताना म्हणाले की पंधरा खोके एकदम ओके साजन पाचपुते यांच्या मार्फत संजय राऊत यांनी


Page 1
11 Oct 2024

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक लोकनेता
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
Powered by - epaper.lokneta.in

श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात आघाडीत बिघाडी होण्याची दाट शक्यता तर युती मध्ये मात्र अलबेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क
श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात मागील काही दिवसांपासून आघाडीच्या उमेदवारी साठी चांगलीच रस्सीखेच चालू आहे मागिल दोन दिवसांत राष्ट्रवादी शरद पवार गटाची उमेदवारी मलाच फायनल असल्याचे राहुल जगताप यांनी सांगितले व शनी चौकात फटाके फोडून कार्यकर्त्यांनी जल्लोष केला याला दोनच दिवस होतात ना होतात तोच काल शिवसेना उपनेते साजन पाचपुते यांनी ही उमेदवारी मलाच फायनल असल्याचे सांगितले व साजन पाचपुते यांच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत फटाके फोडून जल्लोष केला तर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते घनश्याम शेलार हे सुद्धा उमेदवारीसाठी देव पाण्यात घालून बसले आहेत आता उमेदवारी मीळणार कोणाला हे मात्र आघाडीच्या नेत्यांनी गुलदस्त्यात ठेवले आहे त्यामुळे सध्यातरी दावे प्रती दावे केले जात आहेत तालुक्यातील मतदारांचे मात्र चांगलेच मनोरंजन होत आहे मात्र कार्यकर्ते कोणता झेंडा घेऊ हाती असेच गोंधळलेल्या अवस्थेत दिसतं आहेत परंतु तालुक्यात सद्य परिस्थितीत मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाचेच आघाडीच्या उमेदवारी बाबत पारडे जड असल्याची माहिती समोर येत आहे त्यामुळे राहुल जगताप यांनाच उमेदवारी मीळणार असल्याचा दावा केला जात आहे तर युतिची उमेदवारी पाचपुते कुटुंबात विक्रमसिंह पाचपुते यांना फायनल असल्याने तालुक्यात जगताप विरुद्ध पाचपुते हिच खरी लढत होणार आहे तर अनुराधा नागवडे मात्र कोणता झेंडा घेऊ हाती अश्या अवस्थेत आहेत नाही उमेदवारी मीळाली तर प्रसंगी अपक्ष उमेदवार म्हणून लढण्याच्या तयारीला लागले आहेत परंतु जरी अपक्ष उमेदवारी केली तरी मतदार यांना स्विकारणार का हा खरा प्रश्न आहे कारण मतदार मुद्दा हुशार आहेत अपक्ष जरी आमदार झाले तरी तालुक्याला विकास निधी उपलब्ध होणार नाही हे मतदारांना चांगलेच माहीत आहे त्यामुळे जगताप विरुद्ध पाचपुते असाच सामना श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात रंगणार असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे.

पंधरा खोक्यात श्रीगोंद्याची जागा विकली असा गंभीर आरोप जगताप यांनी साजन पाचपुते व संजय राऊत यांच्यावर केला आहे सांगलीची पुनरावृत्ती श्रीगोंद्यात होईल असे जगताप यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आघाडी कडुन जरी उमेदवारी नागवडे यांना मिळाली असली तरी नागवडे यांच्या समोर राहुल जगताप कडवे आव्हान उभे करणार हे निश्चित आहे त्यामुळे जगताप आपल्या कार्यकर्त्यांना वार्यावर सोडून देणार नाहीत हे वास्तव आहे जगताप यांच्या भुमीके मुळे नागवडे यांची डोकेदुखी मात्र नक्कीच वाढणार आहे तर जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अण्णासाहेब शेलार हे सुद्धा वंचित बहुजन आघाडी कडुन उमेदवारीच्या रिंगणात उतरले आहेत एकिकडे राहुल जगताप यांच्या निवासस्थानी आज कार्यकर्त्यांची बैठक झाली आणि बैठकीत अपक्ष लढण्याची घोषणा करण्यात आली त्यामुळे जगताप बंडखोरी करणार हे निश्चित झाले आहे तर अण्णासाहेब शेलार वंचित बहुजन आघाडी कडुन उभे ठाकले आहेत तर घनश्याम शेलार हे सुद्धा विधानसभा लढविणार असल्याची माहिती हाती आली आहे त्यामुळे अनुराधा नागवडे यांची तिकीट मिळवून सुद्धा चांगलीच कोंडी होणार आहे मात्र मत विभागनी चा फायदा भाजपच्या उमेदवार डॉ प्रतिभा पाचपुते यांना निश्चीतच होणार आहे हे मात्र नक्की त्यामुळे सध्या तरी डॉ प्रतिभा पाचपुते यांचेच पारडे जड असल्याची चर्चा मतदार संघात होताना दिसत आहे एकंदरीत पाहता युती मध्ये अलबेल तर आघाडी मध्ये बिघाडी हेच चित्र सध्या तरी तालुक्यामध्ये दिसत आहे....

**लोकनेता न्युज नेटवर्क चा अंदाज खरा ठरला**




**अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष कांतीलालजी चानोदिया यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन सत्कार करताना गांधी महाविद्यालयाचे मा.जी.एस किरण शिनगिरे समवेत मुख्याध्यापक शिकारे सर, उपमुख्याध्यापक सरडे सर,गोले सर,बापू वीर आदी दिसत आहेत.**

संपादकीय

# अलिप्ततेची सत्त्वपरीक्षा



लोकनेता न्यूज नेटवर्क

इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष भारताच्या हिताचा नाही. इराणने क्षेपणास्त्रांचा तुंबळ मारा केल्यानंतर राजकीय नवसंजीवनी मिळालेले इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी 'इराणला याची किंमत चुकवावी लागेल,' असे म्हटले आहे. इस्रायलने लगेच टोल्याला प्रतिटोला असे न करता काहीशी वाट पाहण्याचे ठरविलेले दिसते. इस्रायल इराणी तेलविहिरी तसेच तेल शुद्धीकरण प्रकल्प उद्ध्वस्त करण्याचा विचार करीत आहे; असे म्हणतात. असे झाले तर जगाचा तोटा होईल तो होईलच; पण भारताच्या अर्थकारणाला आणि एकूण विकासाच्या वाटचालीला तो जबर फटका असेल.

अनेकदा इराणकडून आयात होणाऱ्या तेलाचे प्रमाण गरजेच्या दहा टक्क्यांच्या वर असते. रशिया-युक्रेन यांच्या संघर्षात जसे भारताने दबावाला बळी न पडता रशियाकडून तेल घेणे थांबविले नाही, तसेच 'इराणकडून तेल घेऊ नका,' हे जागतिक दादांचे फर्मानही आपण कधी ऐकले नाही. अर्थात, इराणी तेलविहिरी उद्ध्वस्त करण्यापूर्वी इस्रायलला दहादा विचार करावा लागेल. ताजा आखाती संघर्ष सुरू झाल्यापासून तेलाच्या किमती एकदा तीन व एकदा दोन अशा पाच टक्क्यांनी वधारल्या आहेत. जगभर शेअर बाजारांना हुडहुडी भरते आहे. थोडी जरी अस्थिरता आली तरी लगेच सोने वधारते. तसे होते आहे. या साऱ्या घटनाक्रमात आधी युद्धग्रस्त इराणचे आणि नंतर इतर आखाती देशांमधील खनिज तेल भारताला मिळाले नाही तर मोठाच अनवस्था प्रसंग उभा राहील. तशी दुश्चिन्हे दिसत आहेत.इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली असतानाच इराणी बंदरांजवळ इराण आणि भारत यांच्या नौदलांचा संयुक्त युद्धसराव सुरू झाला आहे. असे युद्धसराव अचानक होत नाहीत आणि त्यांची तयारी अनेक महिने सुरू असली तरी आखातात संघर्ष पेटल्यानंतर भारताने हा युद्धसराव रद्द केला नाही; हे लक्षात घ्यावे लागेल. मोठ्या युद्धाचे काळे-कभिन्न ढग आखाती आकाशात भरून आलेले असताना भारताच्या युद्धनौका आखातात असणे; याला अतिशय महत्त्व आहे. हा औपचारिक युद्धसराव संपल्यानंतर इराणच्या विनंतीने किंवा स्वत:हून भारतीय युद्धनौका इराणी सागरातला मुक्काम वाढवितात का, हे पाहावे लागेल. इराण व इस्रायल यांच्या संवादासाठी भारत प्रयत्न करेल का, या प्रश्नावर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी परवा होकारार्थी उत्तर दिले. मात्र, भारताला रशिया व युक्रेन यांच्या संघर्षात अशी कोणतीही भूमिका अद्याप बजावता आलेली नाही. तेव्हा इराण व इस्रायल आपले ऐकतील, असा समज करून घेण्यात काही अर्थ नाही. अर्थात, हा संघर्ष टळला तर जागतिक शांतीइतकाच भारतीय अर्थकारण वाचविण्याचा प्रमुख उद्देशही साध्य होणार आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा मोठा फटका भारताला आज बसतो आहे. आखाती संघर्ष अधिक पेटला तर तो कित्येक पटींनी वाढेल.अण्वस्त्रसज्जता कबूल न करणाऱ्या इराणने चार वर्षांपूर्वीही इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली होती. इस्रायलने इराणी अधिकाऱ्यांना टिपणे, स्फोट घडवून आणणे अशी माफक उत्तरे तेव्हा दिली तरी सुदैवाने थेट युद्धास तोंड फुटले नव्हते. तसेच यावेळीही होऊ शकते. दुसऱ्या महायुद्धानंतर 'मर्यादित युद्ध' (लिमिटेड वॉर) अशी संकल्पना विकसित झाली. (पुढे अमेरिकेने ती 'मर्यादित अणुयुद्ध' अशी ताणली.) असे मर्यादित युद्ध झाले तर प्रत्युत्तर देण्याची खुमखुमी भागते; तशीच आपल्या ताकदीची नेमकी कल्पनाही शत्रूला करून देता येते. तेव्हा सर्वंकष युद्धाच्या वाटेला न जाता गेली अनेक दशके चालू असणारी खडाखडी इराण व इस्रायल कायम ठेवतात, की यावेळी मात्र टोकाला जातात, यावर सारे अवलंबून आहे. अमेरिकी अध्यक्ष जाहीरपणे काहीही बोलत असले तरी असे युद्ध न होण्यासाठी अमेरिकेने इस्रायलवर दबाव टाकणे, आवश्यक आहे. आज आखातात इस्रायल अनेक आघाड्यांवर लढत आहे. मात्र, देशात मनुष्यबळाचा तुटवडा पडतो आहे.भारतासहित इतर देशांमधून विविध प्रकारचे कर्मचारी मागवावे लागत आहेत. त्यातच इराणकडे अणुबॉम्ब आहे आणि तिथल्या शिया राज्यकर्त्या धर्मगुरूंच्या शहाणपणाला मध्ययुगीन संकल्पनांचे कुंपण आहे; हे विसरून चालणार नाही. थोडक्यात, या संघर्षात आपली नेमकी किती शक्ती पणाला लावायची, याचा समंजस विचार इस्रायलला करावा लागेल. इराण काही वर्षांत अनेक अंगांनी कमकुवत झाला आहे आणि तो भासवतो तितका बलिष्ठ नाही; असे अनेक अभ्यासक मानतात. हे खरे असेल तर इराणची शिल्लक ताकद इतर अनेक मार्गांनीही संपवता येईल. त्यासाठी युद्ध कशाला? इराण हा जुना मित्र आणि दुसरीकडे इस्रायली मैत्रीची ओढ; या दुविधेत भारताच्या अलिप्ततेची नवी सत्त्वपरीक्षा सुरू झाली आहे. दोन्ही मित्रांचे हात पकडून त्यांना थांबविण्याइतकी ही अलिप्तता अजून शक्तिशाली झालेली नाही; ही बोच या निमित्ताने अधिक ठळक होते.

# सुखद स्वयंप्रज्ञेचे सुचिन्ह!

लोकनेता न्यूज नेटवर्क

बुद्धिबळपटू हरिका द्रोणावल्लीपुढे आता दोन वैयक्तिक, कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेमुळे पुढे ढकलल्या गेलेल्या आई आणि आजीच्या गुडघेरोपण शस्त्रक्रियांच्या तारखा ठरवून त्या लवकरात लवकर करून घेणे आणि लेक हन्विकाच्या दुसऱ्या वाढदिवसाची तयारी. हरिका 'परफेक्शनिस्ट' असल्याने यात कोणतीही हलगर्जी होणार नाही, याची सर्वतोपरी दक्षता तिला घ्यायची आहे; अगदी तशीच, जशी तिने बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या निर्णायक सामन्यातील डावात अझरबैजानच्या गुनाय मम्मदझादाशी पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना घेतली होती. अखेरच्या या अकराव्या फेरीत हरिका पहिल्या पटावर खेळत होती आणि तिचा या डावातील विजय महिला संघासाठी फार महत्त्वाचा होता. नागपूरची दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल यांनीही विजय मिळवले, तर आर. वैशालीला बरोबरीवर समाधान मानावे लागले. पण तोवर भारतीय महिला संघाचे सुवर्णपदक निश्चित झाले होते. जागतिक बुद्धिबळाच्या पटावरील अत्यंत प्रतिष्ठेच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णयश संपादन करून भारताने बुद्धिबळविश्वातील महासत्ता होण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. यात पुरुष संघाचा खुल्या स्पर्धेतील विजय वर्चस्व सिद्ध करणारा होता, तर खडतर परिस्थितीतून वाट काढत महिला संघाने मिळवलेल्या सुवर्णपदकामुळे या यशाची झळाळी आणखी वाढली.बुद्धिबळाच्या पटावरील भारताचे हे वर्चस्व खचितच सुखद आहे. एरवी आपण क्रिकेटप्रेमात इतके आकंठ बुडलेले आहोतच. पण नव्या शतकाच्या सुरुवातीपासून ही परिस्थिती धिम्या गतीने बदलू लागली आणि इतरही खेळांना प्रोत्साहन मिळू लागले. त्यात जसा विविध क्रीडाप्रकारांत झालेला नव्या प्रतिभावान खेळाडूंचा उगम हे एक कारण, तर त्यांचा खेळ दाखविणाऱ्या आणि त्याद्वारे तो पाहणारे प्रेक्षक निर्माण करणाऱ्या संपर्क साधनांचा विस्तार हे दुसरे. क्रिकेटपायी या खेळांचा अगदीच अनुल्लेख व्हायचा, तो टळून त्याकडे लक्ष जाण्याइतपत आपलीही प्रेक्षक म्हणून कामगिरी सुधारली आहे. बुद्धिबळासारख्या-पाहण्यासाठीही मोठ्या संयमाची मागणी करणाऱ्या - खेळातील यश साजरे होणे, हे त्या अर्थाने दिलासादायक.बुद्धिबळ म्हणजे तत्कालीन सोव्हिएत महासंघ, त्यातून फुटलेले देश, रशिया, अमेरिका, हंगेरी आणि अलीकडच्या काळात चीन या प्रबळ



देशांची मक्तेदारी. यंदा ती मोडण्याचा पराक्रम करताना भारताने, विशेषत: पुरुष संघाने खुल्या गटात जे वर्चस्व गाजवले, ते पाहून भारतीयांची मान अभिमानाने ताठ होईल. ऑलिम्पियाडमध्ये खेळाव्या लागणाऱ्या ११ फेऱ्यांत जास्तीत जास्त २२ गुण मिळू शकतात, अशा वेळी भारताच्या पुरुष संघाने २१ गुण मिळवून जेतेपद खेचले. आपल्या मागचा दुसरा संघ १७ गुणांवर आहे, हे पाहिल्यावर या यशाची महत्ता अधिक ठसठशीतपणे दिसेल. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे अमेरिका आणि उझबेकिस्तान आहेत, तर चीन चौथ्या क्रमांकावर आहे. पुरुष संघाने ११ पैकी १० फेऱ्या जिंकल्या आणि १ बरोबरीत सोडवली, म्हणजे एकही पराजय न स्वीकारता हे जेतेपद मिळवले, हे आणखी विशेष. महिला संघाचे ११ फेऱ्यांत १९ गुण आहेत, ते पोलंड आणि अमेरिकेविरुद्ध हार पत्करल्यानंतरही जिद्दीने खेळून अखेरच्या फेरीत केलेल्या कामगिरीमुळे आहेत, हे लक्षात घेतले, तर महिला संघाने विजय अक्षरश: खेचून आणला आहे, हे अधोरेखित होईल. एकाच ऑलिम्पियाडमध्ये दोन्ही सांघिक स्पर्धा जिंकण्याचा प्रसंग २०१८ नंतर पहिल्यांदा घडला आणि असे दुहेरी यश आतापर्यंत फक्त तत्कालीन सोव्हिएत महासंघ, रशिया, अर्मेनिया, हंगेरी आणि अमेरिका यांनीच मिळवले आहे. म्हणजे असे वर्चस्व गाजवणारा भारत हा केवळ सहावा संघ आहे.गेली बरीच वर्षे भारताचा जागतिक बुद्धिबळविश्वातील दबदबा एखाद्या नावापुरता मर्यादित होता. अभिजित कुंटे, रघुनंदन गोखले, प्रवीण ठिपसे, मृणालिनी कुंटे, भाग्यश्री ठिपसे या मराठी नावांची मोहोर बुद्धिबळ पटावर होती. पण, जगज्जेतेपद मिळवल्याने विश्वनाथन आनंद हे त्यातील सर्वांत ठळक. मराठी जनांसाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे जयश्री खाडिलकर यांनी १९७९ मध्ये महिला इंटरनॅशनल मास्टरचा मिळवलेला किताब. भारताने आतापर्यंत ८४ ग्रँडमास्टर निर्माण केले. विश्वनाथन आनंद हा पहिला. म्हणजे सगळे ग्रँडमास्टर घडले आहेत, ते गेल्या साडेतीन दशकांत. आनंदचे महत्त्व अधिक, कारण बुद्धिबळातही कारकीर्द होऊ शकते, यावर अनेकांचा विश्वास त्याला पाहून बसला. ज्या पुरुष भारतीय संघाने यंदाच्या ऑलिम्पियाडमध्ये जेतेपद मिळवले, त्यातील अर्जुन एरिगसी, डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद हे जेमतेम विशीत आहेत, तर २०१८ मध्ये 'लोकसत्ता तरुण तेजांकित'ने सन्मानित झालेला नाशिकचा विदित गुजराथी आता तिशीत. आनंद हा या सगळ्यांची कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर प्रेरणा. आनंद ग्रँडमास्टर झाला, तेव्हा यापैकी कुणाचा जन्मही झाला नव्हता. आज आनंद त्यांचे तोंड भरून कौतुक करण्यासाठी पुढे आला आहे. 'ऑलिम्पियाडमध्ये कोणत्याही संघाने यापूर्वी असे वर्चस्व गाजवल्याचे माझ्या तरी स्मरणात नाही,' हे आनंदचे उद्गार बुद्धिबळातील आपले भविष्य किती उज्ज्वल आहे, याची साक्ष देणारे आहेत.सारे जग आश्चर्यमिश्रित कौतुकभरल्या नजरांनी भारतीय संघाकडे पाहते आहे आणि त्यात महिला संघाचीही प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. कोनेरू हम्पी पहिली भारतीय महिला ग्रँडमास्टर झाली, ती एकविसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीला. त्याला दोन दशके होत असताना आपण जागतिक दर्जाच्या स्पर्धेत जेतेपद मिळवणे खूपच प्रशंसनीय. हम्पी या वेळच्या ऑलिम्पियाडमध्येही खेळली असती, पण वैयक्तिक कारणांसाठी तिने माघार घेतली. त्या वेळी महिला संघात अनुभवी बुद्धिबळपटू हवी, म्हणून प्रशिक्षक अभिजित कुंटे यांनी हरिकाला विनंती केली आणि तिनेही ती मान्य करून संघाच्या यशात आपला अनुभव पणाला लावला. हरिका आपल्या दोन वर्षांच्या मुलीशी स्पर्धेदरम्यान दूरध्वनीवरून बोललीही नाही, ते खेळताना भावनाशीलता बाजूला राहावी म्हणून. तिच्या या समर्पित वृत्तीला जेतेपदापेक्षा मोठे पारिश्रमिक काय असू शकते? महिला संघातील वैशालीसाठीही हे यश असेच मोठे, कारण पुरुष संघातील प्रसिद्ध बुद्धिबळपटू प्रज्ञानंदची बहीण यापेक्षा तिला तिची स्वतंत्र ओळख हवी होती, ती यामुळे मिळाली आहे. यंदाच 'लोकसत्ता तरुण तेजांकित' ठरलेल्या नागपूरच्या दिव्या देशमुखने तर सुवर्णपदक जिंकून सांघिक यशाला वैयक्तिक कामगिरीचीही सोनेरी किनार जोडली आहे.बुद्धिबळ हा अस्सल भारतीय खेळ, पण रशिया आणि तत्कालीन सोव्हिएत महासंघ, तसेच पूर्व युरोपातील देशांनी वर्षानुवर्षे त्यावर अधिराज्य गाजवले. अमेरिकाही फार मागे राहिली नाही आणि चीननेही गेल्या काही काळात मुसंडी मारली. एकच घर पुढे सरकणाऱ्या प्याद्यापासून तिरकी चाल करणारा उंट, अडीच घरे उड्या मारणारा घोडा आणि कसाही सरकू शकणाऱ्या वजिरापर्यंतचे मोहरे खेळवणारे बुद्धिबळ शीतयुद्धाच्या काळात हेरगिरीपर्यंत जाऊन पोहोचले होते. अलीकडच्या काळात 'नेटफ्लिक्स'वरच्या 'क्वीन्स गॅम्बिट' या मालिकेमुळे या खेळाला वलय आले आणि नंतर त्याची महिलांचा बुद्धिबळातील सहभाग ते त्यांच्या पेहरावावरून व्यक्त केली जाणारी मते, अशा विविधांगाने चर्चा होऊ लागली. पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते ते भारताने या खेळात सांघिक जेतेपद मिळवणे. ते आता साध्य झाले आहे. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने संघांना सव्वातीन कोटींचे पारितोषिक जाहीर केले, तेही औचित्याचे. कृत्रिम प्रज्ञेच्या आजच्या प्रभावकाळातही मानवी बुद्धीच्या लखलखण्याला इतके मोठे जागतिक परिमाण आहे आणि त्यात भारत अग्रेसर आहे, हे सुचिन्ह.

# चीनचा खासगी तलाव?

लोकनेता न्यूज नेटवर्क



सर्व जगाचे लक्ष पश्चिम आशियातील रणधुमाळीकडे असताना आपल्या पूर्वेला तेवढ्याच महत्वाचा संघर्ष सुरू आहे. दक्षिण चीन उपसागरातील अक्षरशः ठिपक्यांसारखी लहान बेटे आणि काही ठिकाणी फक्त खडक यांच्यावर कुणाचे नियंत्रण आहे किंवा असावे याबद्दल आक्रमक शह-काटशह अशा जीवघेण्या हालचाली चालू आहेत आणि याच्या मध्यभागी बलाढ्य चीन आपल्या लहान शेजारी देशांशी लढायला तयार आहे. भारताचा क्वाड संघटनेत सक्रिय सहभाग आणि हल्लीच अमेरिकेत अध्यक्षांच्या पुढाकाराने झालेल्या चर्चा, यांच्यामुळे शासनाला त्याची किती जाणीव आहे हे दिसून येते. प्रथम समस्या समजून घ्यावी. वादाचा उगम दुसरे महायुद्ध संपल्यानंतरचा आहे. युद्धकाळात जपानने दक्षिण चीन सागराच्या भोवतालच्या चीनसह सर्व देशांना आपल्या वसाहती बनवल्या होत्या.

जपानचा युद्धात पराभव झाल्यानंतर एक एक करून सर्व देश स्वतंत्र झाले. यात प्रामुख्याने कम्युनिस्ट चीन, व्हिएतनाम, फिलीपिन्स आणि मलेशिया होते. तैवान स्वतंत्र असला तरी चीनने ते कधीच मान्य केले नाही. उल्लेख केलेले सर्व देश दक्षिण चीन उपसागरावर आंतरराष्ट्रीय नियमांप्रमाणे आर्थिक वापर आणि दळणवळणासाठी आपला अधिकार आहे, असे समजतात. सर्व मान्य असले तरी चीनने उपसागराच्या बहुतांश क्षेत्रावर आपला अधिकार घोषित केला आहे व याची सीमा नकाशावर त्यांनी नऊ रेषा आखून दर्शवली आहे; जी संबंधित शेजारी देशांना मान्य नाही. शी जिनपिंग हे सन २०१४मध्ये सत्तेत आल्यानंतर त्यांनी वादाला अधिक धार आणली. महायुद्धात जपानने वसाहती देशांवर केलेल्या अत्याचारांमुळे त्यांनी क्षेत्रात काहीही पुढाकार घेण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे व चीन याचा पूर्ण फायदा घेऊन त्यांच्याकडे दुर्लक्ष करायची संधी सोडत नाही, याची नोंद घ्यायला हवी.

या उपसागरात दोन प्रमुख बेट समूह दिसतात. व्हिएतनामच्या ईशान्येला १३० बेटांचा पॅरासेल समूह आहे. सन १९७४मध्ये चीनने हा समूह बळकावून तिथे हवाईपट्टी बांधली आणि सैनिक तैनात केले. आज हा सर्वांत शांत आणि विनावाद प्रदेश आहे. महत्त्वाचा स्प्रॅटली बेट समूह याचा विस्तार फिलीपिन्सच्या पश्चिमेपासून दक्षिणेला बोर्निओ (मलेशिया) पर्यंत आहे व हा खरा वादाचा टापू आहे. फिलीपिन्सची राजधानी मनिला याच्या जवळची बेटे आहेत त्यांना 'स्कारबोरो शोल' म्हणतात. येथून चीनला मनिलावर नियंत्रण ठेवता येऊ नये म्हणून फिलीपिनी नौदलाने सन १९९९मध्ये 'सियेरा माद्रे' नावाची नौका जबरदस्तीने तेथील किनाऱ्यावर चढवून आपले नियंत्रण जाहीर केले. मागील वर्षी नौकेच्या निमित्ताने बांधकाम करण्यासाठी युद्धनौकांच्या ताफ्यात सामग्री पाठवली आणि चीनने त्यांना अडवले.

पुढे 'सियेरा माद्रे'वरील नाविकांचा रसदपुरवठा कमी पडू लागल्याने फिलीपिनी नौदलाने जूनमध्ये जबरदस्तीने आपल्या नौका धाडल्या. त्यावेळी चीनशी झालेल्या चकमकीत शस्त्रे वापरली गेली नाहीत; परंतु झटापटीत एका फिलीपिनी सैनिकाचा आंगठा कापला गेला. अखेर दोन्ही देशांनी सामंजस्य दाखवून वाटाघाटीत ठरवले, की रसद पुरवठा होऊ शकतो परंतु बांधकाम नाही. सध्या 'सियेरा माद्रे' आपल्या जागेवर आहे, परंतु स्थिती तणावपूर्ण आणि पुढील वाटाघाटींच्या प्रतिक्षेत आहे. फिलीपिन्सच्या दक्षिणेला 'सबिना शोल' बेट समूह आहे जिथे त्यांनी तटरक्षक नौका 'टेरेसा मॅगबुवानाला' एप्रिल महिन्यात गस्त घालण्यास तैनात केली आणि चीनने तिला बळजबरीने हटवण्यासाठी ३१ ऑगस्टला धडक देउन नौकेत भगदाड पाडले व तणाव वाढला. आता याचे पर्यवसान सशस्त्र चकमकीत होऊ नये म्हणून दोन्ही देश प्रयत्नशील आहेत.उपसागराच्या दक्षिणेला मलेशियाचा बोर्निओ प्रांत येतो. मलेशियाला तेथे खनिज तेल व नैसर्गिक वायू यांचा शोध करायचा आहे आणि चीनचा त्याला विरोध आहे. व्हिएतनामच्या पूर्व तटाचा प्रदेश भारतासाठी महत्त्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार व्हिएतनामला तेथे मासेमारी आणि खनिज तेल शोधण्याचा हक्क आहे. चीनचा त्यासही विरोध आहे. करोना काळापूर्वी व्हिएतनामने भारताकडे खनिज तेलाचा शोधासाठी आपल्या नौकांची मदत मागितली होती व त्याप्रमाणे पुढे कारवाई सुरू होती. चीन आणि व्हिएतनाम यांच्यातील वादांमध्ये भारताला विनाकारण अडकायला नको; परंतु काही प्रसंग असे असतात ज्याच्यात भारताला माघार घेणे शक्य नाही.

पश्चिम आशियातील युद्धात जशी अमेरिकेची भूमिका निर्णायक आहे तशीच या प्रदेशातही आहे; कारण अमेरिकेने फिलीपिन्स आणि तैवान यांना गरज पडल्यास सशस्त्र मदतीची हमी दिली आहे. काही वर्षांपूर्वी चीन अधिक आक्रमक झाल्याने अमेरिकेच्या बलाढ्य विमानवाहू युद्धनौका आणि त्यांचे ताफे दक्षिण चीन उपसागरात नियमित गस्त घालत होते. अमेरिकेच्या प्रतिनिधी मंडळाच्या अध्यक्ष नॅन्सी पलोली यांनी चीनच्या कट्टर विरोधात तैवानला प्रसिद्धीच्या झोतात भेट दिली होती. त्यावेळी चीन शाब्दिक विरोधापलीकडे काहीही करू शकला नव्हता. मध्यंतरी परिस्थिती निवळल्याने अमेरिकेने गस्त घालणे कमी केले. परंतु फिलीपिनी घडामोडींमुळे त्यांचे लक्ष पुन्हा इथे वळले आहे. मूळ प्रश्न सोपा आहे - फिलीपिन्सच्या मदतीसाठी अमेरिका कितपत तयार आहे आणि याचा फायदा घेऊन फिलीपाइन्स किती संयम मर्यादा पाळू शकते. क्वाडचा सदस्य असल्याने भारतासाठी हे प्रश्न आता केवळ तात्विक उरले नसून, त्याला त्या प्रश्नांना थेट सामोरे जावे लागणारे आहेत.

भारतासमोर असे प्रसंग आता वारंवार येणार आहेत. रशिया-युक्रेन युद्धात दोन्ही पक्ष भारताच्या मध्यस्थीसाठी राजी आहेत असे समजते; परंतु यात किती तथ्य आहे, हे अद्याप उघड झालेले नाही. तसेच इस्रायल आणि हमास किंवा हिजबुल्ला यांच्या युद्धात भारत शांततेच्या पक्षात असला तरी काय करू शकतो किंवा करेल याबद्दल स्पष्टता नाही, परंतु क्वाड संघटनेचा सदस्य असल्याने पूर्वेकडे भारताकडून ठोस कारवाईची अपेक्षा आहे. पूर्व लडाखच्या सीमेवर आज आपले सैन्य चीनच्या विरोधात तणावपूर्ण वातावरणात सज्ज आहे. ताज्या बातम्यांनुसार काही प्रश्न सुटण्याची शक्यता दिसू लागली आहे, असे समजते. खरा मुद्दा आहे तो या पार्श्वभूमीवर भारत-चीन संबंधांची दिशा काय असावी, हा. क्वाडकडून भारताच्या सहकार्याच्या अपेक्षा आहेत. त्या प्रत्यक्ष दक्षिण चीन उपसागरात उपस्थितीच्या नसून मलाक्का सामुद्रधुनीपासून पश्चिमेला हिंद महासागरात गस्त घालून संरक्षणाच्या आहेत. भारतीय युद्धनौका जशा आफ्रिकेच्या पूर्व तटावर चाच्यांविरुद्ध कारवाई करतात त्याचप्रमाणे पूर्वेकडे सुरक्षा देण्यासाठी करतील, असे अपेक्षित आहे.भारत धोरणात्मक स्वातंत्र्य किती ठेवू शकेल, हा कळीचा मुद्दा आहे. आपले हित फक्त आपणच सांभाळू शकतो. उदा. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नुकतेच अमेरिकेचा यशस्वी दौरा करून आले. परंतु त्यांना भेटण्याआधी तेथील शासनाने काही खलिस्तानी शिख प्रतिधीनींना भेटून संरक्षणाची ग्वाही दिली. तसेच एका अमेरिकी न्यायालयाने आपल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना न्यायालयात हजर राहण्यासाठी फर्मान काढले होते. याला आपण काय म्हणावे? हीच स्थिती चीनच्या बाबतीत आहे. शी जिनपिंग यांचा भव्य पाहुणचार अहमदाबाद आणि नंतर माम्मलापूरम येथे पारंपारिक पद्धतीने केला; याच्यामुळे संबंध काही सुधारले नाहीत. थोडक्यात परराष्ट्र संबंधांत मैत्री, पाहुणचार इ. वातावरण निर्मितीसाठी असतात. कागदावर जिथे सही होते तेच वास्तव असते, हे आपण आत्मसात केले पाहिजे.

# महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार : खासदार सुप्रिया सुळे

## हर्षवर्धन पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल!






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

महाराष्ट्र हा सध्याच्या भ्रष्टाचारी सरकारपासून मुक्त करावयाचा आहे. तसेच दूध,कांदा,सोयाबीन आदी पिकांना चांगला भाव देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यायचा आहे.महाराष्ट्र राज्य हे देशात एक क्रमांकाचे राज्य बनवायचे आहे. निवडणुकीनंतर महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार आहे,त्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी,असे आवाहन खासदार. सुप्रिया सुळे यांनी इंदापूर येथे गुरुवारी (दि.२४) केले.

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून गुरुपुष्पामृतच्या मुहूर्तावर भव्य रॅली काढून गुरुवारी (दि.२४) अर्ज दाखल केला.यावेळी खा.सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करणेपूर्वी भाग्यश्री निवासस्थानी हर्षवर्धन पाटील यांचे खा.सुप्रिया सुळे, भाग्यश्री पाटील,अंकिता पाटील ठाकरे यांनी औक्षण केले.

उमेदवारी अर्ज दाखल झालेनंतर आयोजित महाविकास आघाडी कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्यात खा.सुप्रिया सुळे बोलत होत्या.या मेळाव्याला कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी झाली होती.या गर्दीचीच मेळाव्यानंतर चर्चा सुरू होती.

सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या,राज्याच्या विकासाच्या दृष्टीने ही निवडणूक टर्निंग पॉईंट ठरणार आहे.हर्षवर्धन पाटील हे राज्यपातळीवर काम करणारी नेते आहेत, त्यांना आता राज्यभर काम करावे लागणार आहे.निवडणुकीनंतर विजयाचे सर्टिफिकेट घेऊनच आपण मुंबईला जाऊ या,असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले.

काही लोकं तिकिटासाठी दिल्लीला गेले.आपल सगळं महाराष्ट्रामध्ये ठरतं, असा टोलाही सुप्रिया सुळे यांनी महायुतीतील घटक पक्षांना लगावला. ज्यांच्याकडून कॉन्ट्रॅक्ट दिले जाते ते पैसे घेतात त्यामुळे कामाची गुणवत्ता राहत नाही,आपणास खड्डे मुक्त रस्ते तयार करायचे आहेत,असे सुप्रिया सुळे यांनी नमूद केले.

हर्षवर्धन पाटील भाषणात म्हणाले, महाराष्ट्रामध्ये शरद पवार यांचे एवढे ज्येष्ठ नेते कोणीच नाही. ८४ वर्षांचे संघर्ष योद्धा शरद पवार यांना अडचणीच्या काळात साथ देण्याचा आपण निर्णय घेतला आहे. मात्र इथल्या विद्यमान लोकप्रतिनिधींनी अडचणीच्या काळात शरद पवार साहेबांना धोका दिला आहे.त्यामुळे इथल्या लोकप्रतिनिधींना त्यांची जागा मतदारांनी दाखवून द्यावी.

विद्यमान लोकप्रतिनिधींनी सन २००९ मध्ये आमदारकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस सोडली होती,त्यावेळी त्यांना ६ वर्षासाठी पक्षातून काढून टाकण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.तसेच दोन वर्षांपूर्वी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या विरोधात त्यांनी भूमिका घेतली.शरद पवार यांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी असल्याने आता इंदापूर तालुक्यात विधानसभेला बदल घडणारच,असा विश्वास हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला.

ज्येष्ठ नेते शंकररावजी पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी इंदापूर तालुक्यात सर्वधर्मसमभावाचा विचार मांडला.त्याच सर्वधर्मसमभावाच्या विचारानुसार आम्ही कार्यकर्ते वाटचाल करीत आहोत. आगामी ५ वर्षात इंदापूरचा चेहरा मोहरा बदलायचा आहे,तालुक्याचा सर्व क्षेत्रातील विकास करावयाचा आहे. तालुक्यातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्नही प्राधान्याने सोडविला जाणार आहे,अशी ग्वाही हर्षवर्धन पाटील यांनी भाषणात दिली.

यावेळी पृथ्वीराज जाचक,मुरलीधर निंबाळकर,राहुल मखरे,तेजसिंह पाटील, अँड कृष्णाजी यादव,विलासराव वाघमोडे,भारतीताई शेवाळे,अशोक घोगरे, सागरबाबा मिसाळ,नितीन शिंदे, काका देवकर,प्रा.कृष्णाजी ताटे,अनिल पवार,संजय शिंदे,बाबासाहेब भोंग,तुषार खराडे यांनी मनोगत व्यक्त केले.या सभेमध्ये इंदापूर शहरातील अनिलअण्णा पवार (सदस्य) यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह तसेच बावडा ग्रा.पं. सदस्य पांडुरंग कांबळे,सुनील साबळे, विनोदकुमार जाधव यांनी असंख्य सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला.यांचा सत्कार खा.सुप्रिया सुळे व हर्षवर्धन पाटील यांनी केला.

यावेळी निरा भिमा कारखान्याचे अध्यक्ष लालासाहेब पवार,अंकिता पाटील -ठाकरे,महारुद्र पाटील,राजवर्धन पाटील, महिला तालुकाध्यक्षा छायाताई पडसळकर,कार्याध्यक्षा आश्मा मुलाणी, मयूरसिंह पाटील,अमोल भिसे,सुखदेव घोलप,आशुतोष भोसले,उदयसिंह पाटील,हेमंत नरुटे,उमेश घोगरे,चांगदेव घोगरे,शहराध्यक्ष इनायत काझी, महिलाध्यक्षा रेश्मा शेख,बाळासाहेब पाटील,नंदकुमार सोनवणे,प्रदीप पाटील, मोहन दुधाळ,पांडुरंग शिंदे,शिवाजी हांगे, बापू कोकाटे आदींसह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)कॉंग्रेसचे व विविध संस्थांचे पदाधिकारी,संचालक,कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन कैलास कदम व राजेंद्र पवार यांनी तर आभार अँड.शरद जामदार यांनी मानले.

### इंदापूरची तुतारी मंत्रालयात जाणार -खा. सुळे

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी इंदापूरची तुतारी विधानसभेत पोहोचणार असल्याची ग्वाही इंदापूर येथे दिली होंती.त्याचा संदर्भ घेऊन सुप्रिया सुळे यांनी तुतारी विधिमंडळ बरोबर मंत्रालयातील पोचणार असल्याचे नमूद करताच कार्यकर्त्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

### पवार साहेबांनी राज्याचा विचार करून उमेदवारीचा निर्णय घेतला-हर्षवर्धन पाटील

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षातून ६ जणांनी उमेदवारी मागितली होती. लोकशाहीमध्ये उमेदवारीची इच्छा व्यक्त करणे योग्यच आहे.मी सुद्धा पक्षाकडे उमेदवारी मागणीचा अर्ज केला.पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी राज्याचा सारासार विचार करून माझ्या उमेदवारीचा निर्णय घेतला.माझे पक्षातील या सहकाऱ्यांना आवाहन आहे की,पवार साहेबांचा विचार सोडू नका,त्यांचे हात बळकट करण्याची गरज आहे.उमेदवारी मागणारे सर्वजण आम्ही एकमेकांच्या जवळचे सहकारी आहोत.त्यामुळे यातून निश्चित मार्ग निघेल,असे हर्षवर्धन पाटील यांनी भाषणात नमूद केले.

### २५ दिवस द्या, ५ वर्षे माझी जबाबदारी-हर्षवर्धन पाटील

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मतदान होईपर्यंत २५ दिवस पक्षासाठी द्या,नंतरची ५ वर्षे माझी जबाबदारी राहील,असे आवाहन पाटील यांनी भाषणात केले.

# हॅन्डबॉल स्पर्धेत बीड जिल्ह्यातील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी येथील १४ वर्ष वयोगटातील मुलांचा संघाने प्रथम क्रमांक पटकावला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे



बीड संघांनी १० विरुद्ध ८ अशा फरकाने सेमी फायनल सामना जिंकून अंतिम स्पर्धेमध्ये प्रवेश केला अंतिम सामना संभाजीनगर शहर विरुद्ध बीड संघाने एकतर्फी वीजय मिळून विभागाचे प्रथम क्रमांक मिळवून राजस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला...! दि.१० ऑक्टोबर रोजी मानवत येथील नेताजी सुभाष विद्यालय मानवत या ठिकाणी विभागीय हॅन्डबॉल स्पर्धेचे आयोजन करणात आले होते यामध्ये बीड जिल्ह्यातील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी येथील १४ वर्ष वयोगटातील मुलांचा संघ जाधव मोहम,गर्जे महावीर,भवर सुमित,लाड कृष्णा,लाड राम,पोतदार आयुष कोंडे निलेश,गर्जे आदित्य,सय्यद अशपाक बीड जिल्ह्याचे नेतृत्व करत होता.पहिला सामना बीड विरुद्ध हिंगोली यांच्यामध्ये झाला बीड संघातील हा सामना एकतर्फी विजय मिळवला दुसरा सामना संभाजीनगर (ग्रामीण ) विरुद्ध बीड यांच्यामध्ये झाला या सामन्यामध्ये दोन्ही संघांनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन केले यामध्ये बीड संघांनी १० विरुद्ध ८ अशा फरकाने सेमी फायनल या सामना जिंकून अंतिम स्पर्धेमध्ये प्रवेश केला अंतिम सामना संभाजीनगर शहर विरुद्ध बीड यांच्यामध्ये होऊन बीड संघाने एकतर्फी वीजय मिळून विभागाचे प्रथम क्रमांक मिळवून राजस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला या संघास सरोदे सर,नागरगोजे सर,दिंडे प्रवीण मुरकुटे रुकेश मुरकुटे युवराज फुंदे माऊली यांनी मार्गदर्शन केले विजयी संघांचे अभिनंदन माजी आ. भीमराव धोंडे साहेब युवानेते अजयदादा धोंडे पंडित नेहरू विद्यालयाचे प्राचार्य तथा मुखध्यापक बोडखे सर शाळेतील सर्व शिक्षक,मॅंडम यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नायगाव विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडी कडून डॉ.माधव विभुते यांना उमेदवारी जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने



नायगाव विधानसभा निवडणुकीच्यां तारखा जाहीर झाल्या असतांनाच नायगाव विधानसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार म्हणून मा. डॉ.माधव विभुते यांना वंचित बहुजन आघाडी पक्षा तर्फे उमेदवारी जाहीर करण्यात आली, नांदेड जिल्ह्यामध्ये तथा नायगाव विधानसभेमध्ये हे सर्व दूर परिचित आहेत.तसे पाहता उमरी येथे स्त्रीरोग तज्ञ परी हॉस्पिटल च्या माध्यमातून डॉ.माधव विभूते हे उच्च शिक्षित,सुसंस्कृत व समाज सेवेची आवड असणार व्यक्तिमत्व आहे,त्यांचा जन्म अतिशय गरीब कुटुंबामध्ये झालेला असून ते ओ.बी.सी समाज प्रवरगामध्ये मोडतात,त्यांना तरुण वयापासूनच समाज सेवेची आवड असून,गोरगरीब विद्यार्थ्यांची अडले नडले ली कामे करणे,सामाजिक चळवळीत सक्रिय राहणे हे त्यांचे विशेष गुण वैशिष्ट्य,त्यांच्या या सर्व सामाजिक कामाची दखल घेऊनच वंचित बहुजन आघाडी चे सर्वेसर्वा आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांनी त्यांना उमेदवारी बहाल केली,मतदार संघातील लोकांचा दांडगा जनसंपर्क लक्षात घेता नायगाव विधानसभा मतदार संघात त्यांचा नीच्छितच विजय होईल असे तिन्ही तालुक्यातून अनुभवी व्यक्ती बोलून दाखवत आहेत. माणुसकीचे भांडवल, गरिबांचा आशीर्वाद ,गोरगरिबांचे कैवारी देव माणूस म्हणजे डॉ.विभुते हे तिन्ही तालुक्यातून जनतेतून बोलल्या जात आहे. आम्ही कोणासोबतही राहू,आम्ही कोणासोबतही फिरू, परंतु मतदान मात्र डॉ.माधव विभूते साहेबांनाच करू असे सरळ सरळ जनतेतून बोलल्या जात आहे. एक सर्वसामान्य जनतेला उच्चशिक्षित उमेदवार नायगाव विधानसभा मतदारसंघाला मिळाला आहे त्यामुळे त्यांचा निश्चितच विजय होईल असे तिन्ही तालुक्यातून जनतेतून बोलल्या जात आहे.

# सह्याद्रीच्या कुशीतील आंबीखालसा येथे निसर्गप्रेमींचा स्नेहमेळावा संपन्न

## आंबीखालसा गावचे निसर्गप्रेम आदर्शवत - प्रमोद मोरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

वाढते तापमान आणि पर्यावरणाचा असमतोल लक्षात घेता वृक्षांची कमी झालेली संख्या वाढविणे गरजेचे असून आंबीखालसा निसर्गप्रेमींनी नक्षत्रवन निर्माण करून निसर्ग वाचविण्याचे आदर्शवत काम केले आहे,असे प्रतिपादन निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी व्यक्त केले.

संगमनेर तालुक्यातील आंबीखालसा येथे निसर्गाच्या कुशीत वसलेल्या गावांमध्ये नुकतेच निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळाच्यावतीने स्नेहमेळावा आणि वनसहलीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सुरुवातीला वृक्षमित्र स्व. आबासाहेब मोरे व स्व.सुभाष मोरे यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्याध्यक्षा छायाताई राजपूत ह्या होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राज्यसंघटक डॉ.शरद दुधाट यांनी केले.यावेळी निसर्ग व पर्यावरण मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला.याप्रसंगी सरपंच बाळासाहेब ढोले,जालिंदर आहेर,संजय गायकवाड,प्रकाश केदारी,चंद्रकांत भोजने, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.मंडळाच्या वतीने कृषी विद्यापीठ,राहुरी येथील सावित्रीबाई फुले विद्यालयास पुणे,सोलापूर व अहिल्यानगर या विभागातून 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या स्पर्धेत द्वितीय क्रमांक व १५ लाख रुपये पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे व पदाधिकारी यांच्या वतीने उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे व त्यांचे सहकारी यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी सांगितले की,आंबीखालसाला निसर्गाची देणगी मिळाली असून यात अधिक भर घालण्याचे काम येथील सरपंच बाळासाहेब ढोले, बाळासाहेब गाडेकर आणि ग्रामस्थ करीत आहेत. समाजातील विविध सुखदुःखांच्या प्रसंगी आपल्या आवडत्या व्यक्तीच्या स्मृतिप्रीत्यर्थ झाडांचे रोपण करून त्यांच्या स्मृती कायम जागत्या ठेवाव्यात.कार्यक्रमाच्या अध्यक्षा छायाताई राजपूत यांनी आंबीखालसा गावाचे निसर्गप्रेम उधृत करून इतरांनी या गावाचा आदर्श व प्रेरणा घेण्याचे आव्हान केले.यावेळी तुकाराम जाधव, सुंदरदास करांडे,संदीप कुंभारे, उद्योजक ज्ञानेश्वर कहाने,दीपक ढमढेरे,मीनाताई मोरे,वंदनाताई भोजने,वैष्णवी मोरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी बाळासाहेब गाडेकर व बाळासाहेब ढोले यांनी निसर्गप्रेमींसाठी विरभद्र धबधबा पाहण्याचे व वनसहलीचे निसर्गमय वातावरणात आयोजन केले होते.विरभद्र मंदिर परिसरात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून स्नेहमेळाव्याची सांगता झाली.



# ऐनदिवाळीत सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरांत पडून शासन प्रशासन विधानसभा निवडणुकीत व्यस्त

## हमीभावापेक्षा सोयाबीनचा भाव ३९२ रुपयांनी कमी



### सोयाबीनची आवक घटली

**दिवाळीच्या दिवसांत हे पीक शेतकऱ्यांच्या घरात येते. कर्जाची परतफेड,उसनवार आणि सण,उत्सवासाठी सोयाबीन पिकाच्या विक्रीतून मोठा हातभार लागतो. अल्पभूधारक शेतकरी, कोरडवाहू शेतकऱ्यांची संपूर्ण भिस्त या पिकावर आहे.आता सोयाबीन बाजारात नेण्याची वेळ आली तर पिकाला भाव मिळत नाही. हमीभावापेक्षा कमी भाव आहे. त्यामुळे बाजारात सोयाबीनची आवक घटल्याचे चित्र आहे.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील शेतकऱ्यांनी नगदी पीक म्हणून सोयाबीन पिकाकडे पाहिले जाते, दिवाळीसारख्या सणासुदीच्या दिवसांत सोयाबीन विक्रीतुन शेतकरी सण साजरा करतात. त्यासाठी हे नगदी पीक चांगला हातभार लावते. मात्र, सध्याचे सोयाबीनचे भाव पाहिल्यावर शेतकऱ्यांचा चेहरा पडून अवस्था अधिक बिकट होत आहे. कारण सोयाबीनला शासनाने जाहीर केलेल्या हमीभावापेक्षाही चक्क ३९२ रुपये कमी दर मिळत आहे,

सध्या सोयाबीनला ४३०० ते ४५०० रुपये प्रतिक्किंटल भाव आहे. हमीभावापेक्षा कमी दराने हे सोयाबीन विक्रीला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.शासनाचा हमीभाव ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल आहे.त्यामुळे हा काय कागदावर सांगायचा भाव आहे का,असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत.हा भाव प्रत्यक्षात कधी मिळेल हे तरी सांगा,असे म्हणणे शेतकर्यावर आली आहे. राज्यभरात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहायला सुरुवात झाली आहे. मायबाप सरकारचे विविध घटकांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना मदत, जाहीर केली. परंतु सोयाबीनला भाव मिळत नसतानाही शासनाने त्यांना काहीच मदत जाहीर केली नाही. त्यामुळे बाजारात मातीमोल भावात शेतमाल खरेदी करायचा, मग हमीभावाचे गाजर कशाला ? अशा संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून उमटत आहे. यंदा कमी पावसामुळे सोयाबीनचे दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना पावसाने दांडी मारली. त्यातच विविध रोगांचे आक्रमण झाले. नंतर काढणीच्यावेळी पावसाने थैमान घातल्याने अनेकांची पिके, काढलेले सोयाबीन पाण्यात गेले.त्यामुळे सोयाबीन उत्पन्नात घट आली. यंदा सोयाबीनचे उत्पादन हे प्रतिएकर ४ ते ५ क्विटलवर आले,

मागील २ वर्षांपासून सोयाबीनला मिळणारा भाव लक्षात घेता अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पीक घेण्याला प्राधान्य दिले. मात्र,अपेक्षित भाव मिळत नसल्याने नाइलाजास्तव शेतकरी आपली गरज भागविण्यापुरती सोयाबीनची विक्री करीत आहेत.अनेक शेतकऱ्यांनी भाव वाढेल या आशेवर सोयाबीनची साठवणूक घरात करून ठेवली आहे. निसर्गाने दगाफटका केला. त्यातही सरकारने भाव कमी दिल्याने शेतकरी दुहेरी संकटांत सापडला आहे.

# हरीप्रसाद पांडेनी तबला वादनात पारितोषिक मिळविले प्रा.डॉ.हरिबाबु सह गुरूजनानी सन्मानित

**“ तबल्यावर चालणारी बोटे अनेकांना ठेका धरायला भाग पाडतात, कित्येक नर्तिका बेधुंद होऊन नृत्य करतात रसिक जनातून टाळ्यांचा पाऊस पडतो, माणूस मनातील सर्व दु:ख विसरून आनंदात मिसळतो, बेचैन माणसांच्या चेहऱ्यावर देखील उदासीनता असली तरी त्यांचा चेहरा आनंदी फुलून दिसतो एवढी किमया तबलावादनात आहे,हरिप्रसाद पांडेने ही अवगत केलेली तबला वादनाची कला यशाच्या शिखरापर्यंत निश्चितच त्यांना घेऊन जाईल असे वाटते.**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

असे म्हणतात की राजकारणी लोकांचा मुलगा राजकारणी,शेतकऱ्याचा मुलगा शेतकरी, हिरोचा मुलगा हिरोच, डॉक्टरचा मुलगा डॉक्टर तर कलाकारांचा मुलगा देखील कलाकार हे अगदी खरेच ठरते,नायगाव शहरातील माणिक नगर येथे राहणारे बाळासाहेब पांडे यांनी एकेकाळी तबला वादनात जिल्हा पातळीवरील स्पर्धेत बाजी मारली होती आज त्यांचे सुपुत्र हरिप्रसाद पांडे यांनी देखील तबलावादनात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविल्यामुळे शरदचंद्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर के हरि बाबू आणि सर्व प्राध्यापक मंडळी यांनी तोंड भरून कौतुक करीत हरिप्रसाद पांडे यांना सन्मानित केले.

गायन आणि वादन ही कला ज्यांना अवगत करायची आहे त्यांनी कठोर परिश्रम घ्यावे लागते,घरचे संस्कारही संगीताशी जोडलेले असले की मनातील आवड आणि संगीताचे मार्गदर्शन मिळत राहिली की कला पुढे सरकते, हरिप्रसाद पांडे यांच्या घरात अध्यात्मिक, भक्तीमय वातावरण आणि वडील एक तबलावादक निवेदक शिक्षक आणि पत्रकार असल्यामुळे त्यांना सतत तबलावादनाचे मार्गदर्शन मिळत राहिले नुकत्याच संपन्न झालेल्या युवक महोत्सव २०२४ मध्ये तबलावादनात प्रथम तर शास्त्रीय ताल वादनात त्यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले असल्याने शरदचंद्र महाविद्यालयाची प्राचार्य डॉक्टर के हरिबाबू, उपप्राचार्य श्याम पाटील,डॉक्टर सानप,प्रोफेसर डॉक्टर बलभीम वाघमारे,डॉक्टर गो.रा.परडे या सर्व गुरुजनांच्या उपस्थितीमध्ये हरिप्रसाद पांडे यांचा सन्मान करून अभिनंदन करण्यात आले.

### बोंडाळी येथील युवकांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

# आ.मुटकुळे यांचे विकास कार्या पाहून अनेक तरुणांनी केला भाजपमध्ये प्रवेश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभेतील बोंडाळी येथील तरुणांनी भारतीय जनता पार्टीमध्ये हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक तरुणांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला ऐन विलक्षण च्या तोंडावर नवतरुणांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केल्याने येणाऱ्या विधानसभेसाठी नक्कीच भारतीय जनता पार्टीला या नवतरुणाचा फायदा होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे बोंडाळी येथील तरुणांनी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या कार्याचे व विकास कामाचे कार्य पाहून भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केल्याचे या तरुणांनी सांगितले आहे,

# आष्टी मतदार संघातून मेहबूब शेख यांना उमेदवारी जाहीर

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने केली ४५ उमेदवारांची घोषणा**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने आज ४५ विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा केली. यामध्ये आष्टी मतदार संघातून मेहबूब शेख यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज ४५ उमेदवारांची घोषणा केली. यामध्ये राहुरी मतदार संघातून प्राजक्त तनपुरे इस्लामपूर मतदारसंघातून स्वत:जयंत पाटील कर्जत जामखेड मतदार संघातून रोहित पवार घनसावंगी मतदार संघातून राजेश टोपे शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदारसंघातून प्रताप ढाकणे तर पारनेर विधानसभा मतदार संघातून राणी लंके यांना उमेदवारी देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

# आष्टी मतदार संघातून मेहबूब शेख यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाची उमेदवारी जाहीर

## मेहबूब शेख यांच्या उमेदवारीने मतदार संघात एकच जल्लोष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

साधी ग्रामपंचायत सदस्य नसलेल्या मेहबूब शेख यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाने आष्टी मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे यामुळे मतदारसंघांमध्ये एकच जल्लोष होत आहे.शरद पवार यांचे विश्वासू म्हणून त्यांची ओळख आहे.सुरुवाती पासूनच त्यांनाच उमेदवारी मिळेल असे तर्क वितर्क लावले जात होते.आष्टी मधून राम खडे हेही उमेदवारी मिळवण्यासाठी मोठे प्रयत्न करत होते.त्यांनी तसा भेटीगाठीवरही जोर दिला होता.पण अखेर महबूब शेख यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.आष्टी मतदार संघामध्ये भाजपमधील उमेदवारीवरून मोठा पेच निर्माण झाला आहे यालाच वैतागून दोन दिवसापूर्वीच आष्टी मतदार संघातून भीमराव धोंडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदार संघ असलेल्या आष्टी,पाटोदा,शिरूर या तीन तालुक्याचा मिळून आमदार होत आहे.शिरूर आणि पाटोदा हे दोन तालुके नुसते आतापर्यंत मतदानालाच आहेत पण महेबुब शेख यांच्या उमेदवारीने शिरूर तालुक्याला आमदार होण्याची एक प्रकारे संधीच मिळाली आहे.गेल्या कित्येक वर्षापासून मेहबूब शेख हे शरद पवार यांच्या बरोबर सावलीसारखे पाहायला मिळत आहेत.गेल्या पंचवार्षिक पासून सर्वसामान्यांची इच्छा होती की महबूब शेख यांना विधान परिषदेवर घ्यावे पण मध्यंतरी शरद पवारांची राष्ट्रवादी फुटल्यानंतर हे स्वप्नही धुळीत मिळाले.मेहबूब शेख यांना आता एक प्रकारे उमेदवारी देऊन जनतेच्या मनातील सर्वसामान्य माणसाला आमदार करण्याचे भाग्य आम्हाला मिळणार असल्याचे मतदारसंघातील सर्वसामान्य जनता बोलू लागली आहे.तर भाजपकडून कोणाला उमेदवारी मिळते याकडेही सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत.



# प्रा. नितीन दारमोड यांची नांदेड जिल्हा तज्ञ सुलभक म्हणून निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

धर्माबाद तालुक्याचे भूमिपुत्र तथा श्री शारदा भवन शिक्षण संस्था संचलित इंदिरा गांधी ज्युनियर कॉलेज सिडको येथील इंग्रजी विषयाचे विद्यार्थीप्रिय उपक्रमशील प्राध्यापक तथा प्रसिद्ध व्याख्याते नांदेडभूषण प्रा. नितीन दारमोड यांची नांदेड जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड (डाइट) कडून नवनियुक्त शिक्षकांसाठी सेवा प्रवेशोत्तर प्रेरण प्रशिक्षण कार्यक्रम (खपर्वीलींळेप झीसीराश) अंतर्गत नांदेड जिल्हा तज्ञ सुलभक म्हणून निवड करण्यात आली असून त्यांनी नुकतेच राज्यस्तरीय प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. पवित्र पोर्टल प्रणालीद्वारे सेवेत रुजू झालेल्या नांदेड जिल्ह्यातील नवनियुक्त शिक्षकांना नांदेड जिल्हा तज्ञ सुलभक म्हणून प्रा. नितीन दारमोड हे सात दिवसीय प्रशिक्षण नांदेड जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे पुढील नोव्हेंबर महिन्यात देणार आहेत. प्रा. दारमोड यांच्यावर सर्व क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904